# प्रेसनोट　　　दि.१२.१२.२०१९

**<u>शिर्षक</u>** :- महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ कार्यालय सांगली येथील श्रीमती स्वाती संतोष शेंडे वय ४३ वर्षे, उप जिल्हाधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी अपिलीय अधिकरी, वर्ग- १ तसेच श्री. सुभाष मारुती माळी, वय ५३ वर्षे, सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक व सुनिल भुपाल कुरणे, वय ३० वर्षे, कंत्राटी लिपीक यांना ५०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | विश्रामबाग पोलीस स्टेशन, गुरनं ४७५/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८(सुधारीत २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) श्रीमती स्वाती संतोष शेंडे वय ४३ वर्षे, उप जिल्हाधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी अपिलीय अधिकरी, वर्ग- १ २) श्री. सुभाष मारुती माळी, वय ५३ वर्षे, सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक वर्ग–३ ३) सुनिल भुपाल कुरणे, वय ३० वर्षे, कंत्राटी लिपीक, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ कार्यालय सांगली |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी त्यांचे पत्नीचे औद्योगीक विकास महामंडळ, कडेगांव, येथे ९५ वर्षाच्या कराराने प्लॉट घेतलेला आहे. सदर प्लॉटवरती व्यवसाय करण्यासाठी बांधकाम केलेले असुन सदर व्यवसायासाठी रॉ मटेरियल खेरेदी करण्याकरीता तक्रारदार यांचे पत्नीस बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा कडेगांव यांचेकडुन कर्ज मंजुर झालेले आहे. सदर कर्जाची रक्कम मिळणेकरीता तक्रारदार यांचे पत्नीस म.औ.वि.म.सांगली यांचेकडुन कन्सेंट प्रमाणपत्राची आवश्यकता असलेने तक्रारदार यांनी म.औ.वि.म. सांगली येथे आवश्यकत्या कागदपत्रांची पुर्तता करुन अर्ज दिला होता. त्याप्रमाणे त्यांना कन्सेंट प्रमाणपत्र मिळाले होते. दि. ०९.१२.१९ रोजी तक्रारदार हे त्यांचे पत्नीसोबत त्रैपाक्षीक करार करण्यासाठी म.औ.वि.म. सांगली कार्यालयात आले असता श्री. कुरणे, क्लार्क यांनी तक्रारदार यांना कन्सेंट प्रमाणपत्र दिलेल्या मोबदल्यात बक्षीस म्हणुन त्यांचे प्रादेशीक अधिकारी स्वाती शेंडे यांना ५०००/-रु द्यावे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि. ११.१२.१९ रोजी इकडील कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दि.११.१२.२०१९ रोजी केले पडताळणीमध्ये क्लार्क कुरणे व क्लार्क माळी तसेच श्रीमती स्वाती शेंडे यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन लागलीच रक्कम घेवुन येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर लागलीच म.औ.वि.म.सांगली येथे सापळा लावला असता श्रीमती स्वाती संतोष शेंडे वय ४३ वर्षे, उप जिल्हाधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी अपिलीय अधिकरी, वर्ग- १ महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ कार्यालय सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाचेची रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्याअनुषंगाने श्रीमती स्वाती संतोष शेंडे उप जिल्हाधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी अपिलीय अधिकरी, वर्ग- १ तसेच श्री. सुभाष मारुती माळी, सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक व सुनिल भुपाल कुरणे, कंत्राटी लिपीक त्यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६
संकेत स्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप :- acbmaharashtra.net　टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५　व्हॉट्सॲप क्रमांक :- ९८२३६१८००१